
सात सुरांत हरवलेले सी. एम. देसाई



आरतीय संगीत हे त्यांचं व्यसन बनलं आहे. इतकं की आपल्या घरालाही सी.एम. देसाईंनी संगीताचं म्युझियम बनवलंय. त्यांच्या पत्नी कधीतरी मस्करीदाखल म्हणतातही, 'हे व्यसन अगोदर समजलं असतं तर मी यांच्याशी लग्नच केलं नसतं.'

□ विजय अकेला

आनंद बक्षींनी ५५० चित्रपट गीतं लिहिली की ५२८? त्यांच्या २३व्या चित्रपटात किती गाणी होती? शंकर-जयकिशनच्या संगीतात कोणतं गीत शंकरने संगीतबद्ध केलं आणि कोणतं जयकिशनने? १९३२ मध्ये एच.एम.व्ही.ने सर्वात पहिली रेकॉर्ड कोणत्या चित्रपटाची तयार केली? *पाकिजा*ची कोणती गीतं रेकॉर्ड तर झाली पण वापरली गेली नाहीत?

अशा अनेक गोष्टी आहेत ज्यांची आपल्याला सुतराम कल्पना नसेल. पण सान्ताक्रूझ पश्चिमला स्टेशनजवळ असलेल्या बेसन्ट स्ट्रीटला कल्पना बिल्डिंगमध्ये राहणाऱ्या सी. एम. देसाई यांच्या दोन खोल्यांच्या राहत्या घरात बसायला सोडाच साधी उभं राहायला जागा नसते. जरा जपून, नाहीतर १९५५मधल्या देव आनंदच्या *सीआयडी*च्या रेकॉर्डवर तुम्ही चुकून बसाल. नाहीतर *संगम*च्या रेकॉर्डवर तुमचा पाय पडेल आणि मग ती कुठे ठेवावी असा तुम्हालाच प्रश्न पडेल.


आज सगळं जग संपत्तीच्या मागे असताना

सी. एम. देसाई मात्र चोरबाजारात जुन्यापुराण्या दुर्मिळ रेकॉर्ड्सच्या शोधात उन्हा-तान्हाची पर्वा न करता भटकत असतात. त्यांच्या पत्नी या सुरेल छंदाबद्दल कधी थट्टेने म्हणतातही, 'मला यांच्या या व्यसनाविषयी अगोदर कळलं असतं तर मी त्यांच्याशी लग्नच केलं नसतं. आमच्या बेडरूममध्येही रेकॉर्ड्स आणि कॅसेट यांचंच वर्चस्व आहे.'

देसाई म्हणतात, 'काय करू? संगीतच माझं सर्वस्व आहे. मला परमेश्वराने या पृथ्वीवर संगीताची सेवा करण्यासाठीच पाठवलं आहे. माझ्या वडिलांनीही ४० च्या दशकातल्या न्यू थिएटर्स आणि बॉम्बे टॉकीजच्या सगळ्या गीतांच्या रेकॉर्ड्सचा संग्रह केला होता. ते रोज तासन्‌तास त्या ऐकत बसत. माझ्यातही त्यांच्या या गुणाचा वारसा आला आहे.'

सुरुवातीला सी. एम. साहेब संगीताशिवाय अन्य व्यवसायांवर आपली उपजीविका चालवत असत. पण गेल्या ३५ वर्षांपासून ते स्टेज प्रोग्रॅम करतायत. कधी गातात तर कधी मिमिक्री करतात. आता तर ते चित्रपट संगीताचे सर्वात महान संग्रहक झाले आहेत. शिवाय ते चित्रपट संगीताचे इतिहासकारही आहेत. त्यांची ही ख्याती चित्रपटव्यवसायातील बऱ्याच जुन्या-जाणत्या दिग्गजांपर्यंतही पोहोचली आहे. म्हणूनच तर कधी बी. आर. चोप्रा त्यांना स्वतः फोन करून सांगतात की, त्यांच्या पहिल्या चित्रपटातील सगळ्या गीतांची सीडी करून हवी आहे तर कधी महेन्द्र कपूरना कुठल्याशा संदर्भासाठी त्यांची मदत लागते. एक दिवस अनु मलिक त्यांच्या घरी आले आणि म्हणाले, 'मला आजवर हिट ठरलेल्या २०० गीतांची यादी द्या. कॉपी करायची आहेत.' तर एकदा प्यारेलाल (लक्ष्मीकांत) त्यांच्याकडे आले आणि एक प्यार का नग्मा है...'चं चांगलं रेकॉर्डिंग करून मागितलं. कविता कृष्णमूर्तीनेही आपल्या गाण्यांची लिस्ट देसाईसाहेबांकडे मागितली होती.

भगवानदादा आणि आनंद बक्षींचं अवसान झालं तेव्हा अवघ्या अर्ध्या तासात त्यांच्या जुन्या गाजलेल्या गीतांचा सगळा खजिना देसाईसाहेब उघडून बसले होते. कामाच्या प्रती त्यांची निष्ठा वाखाणण्याजोगी आहे. रात्री-अपरात्रीपर्यंत जुनी गीतं ऐकणं हा त्यांचा छंद आहे. संगीतावर आधारित अनेक ग्रंथांच्या प्रकाशनात देसाईसाहेबांनी मोलाचं मार्गदर्शन केलं आहे.



▲ अर्धांगिनीसह संगीतवेडे सी. एम. देसाई

▼ खय्याम आणि रवींद्र जैनसह



आजच्या संगीताविषयी त्यांना काळजी वाटते. ते म्हणतात, 'आधुनिक संगीत आजच्या पिढीच्या किती लक्षात राहतं? ही पिढी ते लगेच विसरून जाते. अशावेळी आपल्यासारख्या गेल्या पिढीतल्या लोकांना तरी ही पिढी कितपत लक्षात ठेवेल? याचा अर्थ माझ्याकडे आजच्या संगीताचं कलेक्शन नाही असं नाही. मी आजचं संगीतही खरेदी करतो, त्याचा संग्रह करतो.'

देसाईसाहेबांचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा हा सुरांचा खजिना कोणासाठीही सदैव उघडा असतो. ते तुमच्या कोणत्याही प्रश्नाचं उत्तर द्यायला तत्पर असतात. तुम्हाला जुन्या नव्या गीतांचं रेकॉर्डिंग करायचं असलं तरीही ते करून देतात.

सध्या झी टीव्हीवर प्रसारित होणाऱ्या *सारेगामापा* या कार्यक्रमाचा आधार देसाई साहेबांचा खजिनाच आहे. या अगोदरही झीवरील *गाता रहे मेरा दिल*, *फिल्म दिवाने*, *जुगलबंदी* तर झी सिनेमावरील *मेकिंग ऑफ अ लेजन्ड*, टीव्ही एशियावरील *चल शुरू हो जा*, सीएमएमवर *सिक्स्टी इयर्स ऑफ प्लेबॅक*, डीडीवरील *ताक् धिना धिन*, डीडी टूवरील *हॅलो मुंबई*, *कहानी आपकी गीत हमारे*, *सुनसुनसुन*, *हसते हसते*, *सुनहरे गीत* वगैरे संगीतावरील अनेक कार्यक्रमांसाठी देसाईंचं संशोधन मोलाचं ठरलं आहे.

त्यांना संतानसुख नाही. ते म्हणतात, 'माझ्या मरणोत्तर या संग्रहाचं मी काय करू याबाबत माझ्याकडे आजवर अनेक प्रस्ताव आले. काही चांगले होते तर काही मनाला यातना देणारे. मी माझी ही संपत्ती पुण्याच्या फिल्म आर्काइव्हजला दान करण्याचा निर्णय घेतला आहे. ते मला त्याची चांगली किंमतही द्यायला तयार आहेत. ही गोष्ट नंतरची आहे. सध्या तरी मरणाचा विचार नाही. आज मी संगीताची आणि संगीत माझी चांगली सोबत करत आहे.'

त्यांना एकाच गोष्टीचं वाईट वाटतं. 'मी दुसऱ्या एखाद्या देशाचा नागरिक असतो तर संगीताचा इतका अफाट संग्रह करणारा म्हणून अनेक पुरस्कारांचा मानकरी ठरलो असतो. आणि माझी प्रतिष्ठाही वाढली असती.' ●